# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**सकाळ**

---

**दिनांक २६.०५.२०२३ शुक्रवार**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारुबंदी, जुगार, ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

नागपूर शहर पोलीसांनी नागपूर शहरातील पोलीस ठाणे हद्दीत मु.दा.का. अन्वये ०९ केस, व एन.डी.पी.एस. कायदा अन्वये ०४ केस, असे एकुण १३ केसेसमध्ये एकुण १३ ईसमावर कारवाई करून रू १३,८०५/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०९ केसेस, मध्ये एकुण १२ ईसमावर कारवाई करून रू १,०७,८७९/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण २,३७२ वाहन चालकांवर कारवाई केली. व एकूण रू. २,१४,३००/— रू तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी नियम पाळुन सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पोलीस ठाणे वाडी:— चोरी करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा दाखल**

दिनांक २३.०५.२०२३ चे १९.०० वा. ते २०.०० वा. चे दरम्यान फिर्यादी कल्पना चंद्रशेखर पिल्लारे, वय ३६ वर्षे, रा. महादेव नगर, दत्तवाडी, नागपुर ह्या मुलगा व नातेवाईकासह बाहेरगांव येथुन जयप्रकाश नगर येथुन ऑटोत इतर प्रवाशांसह बसून महादेव नगर येथील आपले घरी परत आले असता, फिर्यादी यांनी आपल्या बॅगसह सामानाची पाहणी केली असता, बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने व नगदी १,१००/—रू. असा एकुण ९८,६००/—रू. चा मुद्देमाल बॅगमध्ये दिसुन आला नाही. तो कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.ठाणे वाडी येथे मपोउपनि. काळे ९५७९०१९१८८ यांनी अज्ञात आरोपी विरूध्द कलम ३७९ भादवि. अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीचा शोध घेत आहे.

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर शहर.**